# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३२ वे | अंक दुसरा | पृष्ठे १० | फेब्रुवारी २०२३ | www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92



या अंकात

पान ०४ सुरात रंगला 'पार्ले स्वर वसंत'

पान ०५ पार्ल्यातले दिवस

पान ०६ क्या से क्या हो गया...

पान ०७ रंगुनी रागांत साऱ्या





पान ८
'मैं तो चला'
- तेजस भावे


# 'साठ्ये'त माध्यम महोत्सवाचा थरार

विलेपार्ले येथील साठ्ये महाविद्यालयाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातर्फे आयोजित 'माध्यम महोत्सव' नुकताच उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याकरता गेली दहा वर्षं विभागातर्फे या महोत्सवाचं दरवर्षी नव्या संकल्पनेसह आयोजन होत असतं. गीत ही यावर्षीच्या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना होती. कुछ गीत, कुछ नगमे कुछ गजले या टॅगलाईनवर गुंफलेले विविध उपक्रम हे या तीन दिवसीय महोत्सवाचे आकर्षण ठरले.

पहिल्या दिवशी सुप्रसिद्ध संगीतकार अशोक पत्की यांनी बीज अंकुरे अंकुरे हे गीत संवादिनीवर गात अनोख्या पध्दतीने महोत्सवाचे उद्घाटन केले. भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ता केशव उपाध्ये यांची सन्माननीय उपस्थिती या सोहळ्यास लाभली. संगीतकार अशोक पत्की यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांच्या अनेक लोकप्रिय गाण्यांच्या तसंच जिंगल्सच्या आठवणी ताज्या केल्या. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांना त्यांनी दिलखुलास दाद दिली.



केशव उपाध्ये यांनी या महोत्सवाच्या अनुभवांचा व्यक्तिमत्व उभारणीसाठी पुढील आयुष्यात होणारा उपयोग विशद केला.

याच दिवशी दूरचित्रवाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'सातव्या मुलीची सातवी मुलगी'च्या कलाकारमंडळींनी महोत्सवाला भेट देत विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.

संध्याकाळी गजल या गीतप्रकाराशी परिचय करुन देणारा 'एक शाम गजलके नाम' हा कार्यक्रम सादर झाला. त्यात ज्ञानप्रकाश गर्ग, डॉ. कमर सिद्दिकी, डॉ. झाकीर खान यांनी गजल पेश केली.

महोत्सवात अभिनेत्री आदिती सारंगधर यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपले अनुभव व्यक्त केले. स्वतः अभिनय केलेल्या मालिकांची शीर्षकगीते गाऊन त्यांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली.

या प्रसिद्ध व्यक्तीमत्वांच्या उपस्थितीसह ट्रेझर हंट, नृत्य,गायन, वाद्य जुगलबंदी, उत्स्फूर्त कवितालेखन, कविता पूर्ण करा, शायरी लेखन, स्टॅण्ड अप कॉमेडी, डिजीटल गेमिंग, कविता वाचन, पोस्टरमेकींग, प्रेम कविता, फोटोग्राफी, शॉर्ट फिल्म , फॅशन शो अशा विविध स्पर्धांनी महोत्सव साजरा झाला. विविध ३२ महाविद्यालयातील जवळपास १०० मुलांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

महोत्सवाच्या संकल्पनेला अनुसरून विद्यार्थ्यांनी गणेश वंदना,बोबडी गवळण, उपशास्त्रीय संगीत, लावणी, दाक्षिणात्य संगीत, भूताकोला नृत्य,बॉलिवूड संगीत, नाट्य संगीत, नाटक, आणि वैविध्यपूर्ण गीत, वाद्य प्रकारांचे अतिशय प्रभावी सादरीकरण केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.माधव राजवाडे, उपप्राचार्य डॉ.दत्तात्रय नेरकर, प्रमोदिनी सावंत, माध्यम विभाग प्रमुख गजेंद्र देवडा, सहअध्यापक रसिका सावंत, नारायण परब, स्मिता जैन, सीमा केदारे, गणेश आचवल, रश्मी वारंग यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

पान २ वर





+91 77388 66111/+91 89767 58404 | sales@atharvlifestyle.com

## संपादकीय

मुंबईत अनेक ठिकाणी मेट्रोचे व फ्लायओव्हरचे काम चालू आहे त्यामुळे कुठेही जायचे असले तरी ट्रॅफिक जॅम हा ठरलेलाच ! काही वर्षांनी तरी मुंबईतील प्रवास सुखकर होईल ह्या आशेवरच मुंबईकर आजचा त्रास सहन करत आहेत.

पार्ल्याचे आजचे चित्र काही वेगळे नाहीये. पार्ल्यात मेट्रो नसली तरी पुनर्विकासाचे काम जोरात सुरु आहे. फक्त पार्ले पूर्व भागातच ८० पेक्षा जास्त ठिकाणी 'पत्रे लागल्याची' आमची माहिती आहे. त्या अनुशंघाने होणारी ट्रक्स व टँकर्सची वर्दळ, बांधकामाच्या जागेवरून उडणारा धुरळा, होणारे ध्वनिप्रदूषण, ह्या सर्व गोष्टींचा सामान्य नागरिकाला अतोनात त्रास होत आहे. त्यात भर म्हणून कीं काय, पार्ल्यात अनेक ठिकाणी रस्ता दुरुस्तीचे कामही सुरु आहे. काही ठिकाणी केबल टाकण्यासाठी आधी बांधलेला रस्ता परत खोदत आहेत. फूटपाथ तर अनेक वर्षांपासून अनधिकृत फेरीवाल्यांनी व्यापले आहेतच आणि आता उरलेल्या रस्त्यावर सुद्धा दोन्ही बाजूला पार्किंग करून लोकं वाहतुकीच्या मुरंब्याला हातभार लावत आहेत. दुसऱ्या बाजूला पाहिले तर मनोरंजनाचे असंख्य कार्यक्रम रोजच्यारोज धुमधडाक्यात साजरे होत आहेत. पार्ल्यात रोज संध्याकाळनंतर सुरु होणाऱ्या खाद्य उत्सवात कुठेच खंड पडत नाहीये. मार्केट वस्तूंनी व ग्राहकांनी तुडुंब भरलेले आहे.

ह्यापैकी कुणालाच पार्ल्याच्या दुरावस्थेची काळजी नाही का ? सामान्य माणसाकडून जास्त अपेक्षा ठेवणे चूक आहे हे आम्हाला समजते पण स्वतःला सामाजिक म्हणवून घेणाऱ्या संस्थांना सुद्धा आपल्या जबाबदारीची जाणीव नाही का ? त्यांनीसुद्धा फक्त गाण्याबजावण्याच्या कार्यक्रमातच इतिकर्तव्यता मानावी काय ? आणि आमच्या लाडक्या लोकप्रतिनिधींबाबत काय बोलायचे ? त्यांचे कामच मुळी पार्ल्यातील समारंभांचे अध्यक्षस्थान भूषवण्याचे आणि फिता कापण्याचे आहे. त्यातून वेळ मिळाला तर इतर गोष्टी !

नाही नाही, आम्ही पुनर्विकासाच्या किंवा रस्ते दुरुस्तीच्या विरोधात बिलकुल नाही आहोत पण त्याचे काही नियोजन करायला नको का ? म्हणजे असं कि ट्रक व टँकरच्या वहातुकीच्या वेळा ठरवून द्याव्या, एकदा रस्ता खोदला कि केबल, गॅसलाईन व दुरुस्तीसकट सर्व कामे एकाच वेळी करावीत, काम सुरु असलेल्या रस्त्यांवर नेत्यांच्या 'अथक परिश्रमातून .............' च्या बिभत्स पोस्टर ऐवजी कामाचे स्वरूप, कधी सुरु होणार, कधी संपणार, जबाबदार अधिकारी कोण ? हे सांगणारा फलक असावा. पार्लेकरांना सर्व गोष्टींसाठी नेहमी गृहीतच धरायचे का ?

आणि म्हणे आमचे पार्ले संस्कृतीचे माहेरघर !

आम्ही पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
सलोनी पाटील
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे – अेस ग्राफिक्स

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई–मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

पान १ वरून

## साठ्येत माध्यम महोत्सवाचा थरार

**कोट**

माध्यम विभागातर्फे माध्यम महोत्सव या वार्षिक महोत्सवाचे आयोजन केले जाते. माध्यम आणि संस्कृती या दोहोंचा विचार



करून या महोत्सवाचा विषय निवडला जातो. एक चांगला नागरिक बनण्याची तयारी, मनोरंजनासोबतच माध्यमांच्या इतर विविध कार्यांची जाणीव आणि संघटन कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावे यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो अशा भावना



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव राजवाडे यांनी व्यक्त केल्या

या महोत्सवाला माध्यम विभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी भरघोस उपस्थिती नोंदवली. सार्थक डांगे, तन्मय सांडवे, अथर्व शिर्के, तन्मय जंगम, वैदेही सावंत, ओमकार डांबरे, सोहम मांढरे, निखिल नार्वेकर, अथर्व इंग्रुलकर, ऋषिकेश मुणगेकर, मनाली चव्हाण, चेतन जैस्वार, सायली अंगवळकर, तानिया गायकवाड, भक्ती गुरव या आणि अन्य विद्यार्थ्यांनी चोख व्यवस्थापनातून महोत्सव यशस्वी होण्यास हातभार लावला. गीत या संकल्पनेचे विविध पैलू उलगडतानाच महोत्सवातून खूप सारी ऊर्जा, उत्साह अनुभवायला मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# सुरात रंगला 'पार्ले स्वर वसंत'

आजच्या आघाडीच्या कलाकार गौरी पाठारे व रामांजनेय देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने वसंत पंचमीचे औचित्य साधून पार्ले स्वर वसंत २०२३ हा चार दिवसांचा शास्त्रीय



संगीत महोत्सव २६ जानेवारी ते २९ जानेवारी रोजी लक्ष्मीनारायण प्रसाद लॉन्स, पार्ले पूर्व, मुंबई येथे संपन्न झाला. 'आम्ही पार्लेकर' ह्या महोत्सवाचा मिडीया पार्टनर होते. महोत्सवाचे उद्घाटन आमदार पराग आळवणी, म.टा. चे माजी संपादक अशोक पानवलकर व प्रसिद्ध पत्रकार तसेच एबीपी माझा चे संपादक राजीव खांडेकर यांच्या शुभ हस्ते दीप प्रज्वलनाने



झाले.

महोत्सवाच्या पहिल्या दिवसाची सुरूवात पं. मुकुंदराज देव यांच्या दमदार तबला एकल वादनाने व पं.रूपक कुलकर्णी यांच्या अत्यंत भावमधुर व तितक्याच ताकदीच्या बासरी वादनाने झाली. मुंकुंदराज यांनी लोकांशी उत्तम संवाद साधत लोकांची मने जिंकली तर रूपकजींच्या अत्यंत भावविभोर राग रागेश्रीच्या सादरीकरणास पं. मिथिलेश झा यांच्या तबल्याची साथ लाभली आणि त्याला रसिकांची विशेष दाद मिळाली.

मिरजेचे पिढीजात तानपुरा मेकर



शमसुद्दीन सतारमेकर यांचा वर्षानुवर्षे उत्कृष्ट वाद्य निर्मिती करून कलेची सेवा केल्याबद्दल व कलाकारांना उत्तमोत्तम वाद्ये सातत्याने बनवून दिल्याबद्दल लौकिक आर्ट्स फाऊन्डेशन तर्फे १०००१/- रुपये देऊन गौरव करण्यात आला.

परदेशात राहूनही शास्त्रीय संगीत जोपासणाऱ्या कलाकारांना भारतात व्यासपीठ



उपलब्ध करून देणे हे महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाचे आकर्षण ठरले. विश्वास शिरगावकर, श्रीवानी जडे व श्री मदन ओक ह्या अमेरिकेतील कलाकारांनी हे सत्र सजवले.

दिनांक २८ व २९ जानेवारी रोजी ह्या विनामूल्य महोत्सवाचे तिसरे व चौथे सत्र पार पडले.

महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी इंदूरच्या शोभा चौधरी यांनी रागधानी ने प्रसन्न वातावरण निर्मिती केली. त्यानंतर या सत्रातील प्रमुख आकर्षण पं. प्रवीण गोडखिंडी यांनी राग शुद्ध



कल्याण गायकी अंगाने सादर करून समा बांधला. अत्यंत सुरेल, असरदार व सशक्त सादरीकरण करून लोकांची वाह! वाह! मिळवली .

पं. प्रसाद खापर्डे यांनी गाणे आपलेसे करून अत्यंत प्रभावी पद्धतीने सादर करुन श्रोत्यांना सुखद आनंद दिला. आवाज, लगाव, संपूर्ण सादरीकरण व लकबी ह्यांमधे हुबेहूब त्यांचे गुरु उ.राशिद खान ह्यांची प्रतीकृती दिसली.

त्यांनी रागाचे सादरीकरण करून तिसऱ्या सत्राची सांगता केली.

महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी प्रथम आदित्य मोडक यांनी राग अत्यंत सुरेल व ग्वाल्हेरी गायकी वापरून सादर केला. त्यांच्या दमदार सादरीकरणाने सुरुवात झाल्यानंतर अनुपमा भागवत यांनी शामकल्याण राग अत्यंत असरदारपणे पेश करून रसिकांची मने जिंकली. महोत्सवाची सांगता गौरीताई पाठारे यांच्या सुरेल व भावपूर्ण गायनाने झाली. राग नंद व भजन सादर करून त्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले आणि पार्ले स्वर वसंत महोत्सवाला रसिकांची चांगली दाद मिळाली.



# सातत्य, मेहेनत व दूरदृष्टी

कोविडने दोन वर्ष सर्व जगाला वेठीला धरलं आणि हँडसॅनिटायझर, डिसइनफेक्टन्ट वगैरे शब्द अगदी अशिक्षित अथवा अर्धशिक्षितांच्याही तोंडी रुळून गेले. पण या साऱ्याचा १९७८पासून व्यवसाय करणाऱ्या आणि अगदी निर्यातही करणाऱ्या भाटवडेकर कुटुंबाची आणि त्यांच्या सिरॅमॅक्सो केमिकल प्रायव्हेट लिमिटेड या आज शंभर कोटीची मजल मारलेल्या कंपनीची किती पार्लेकरांना ओळख आहे?

व्यवसायाचा कोणताही संपर्क नसलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबातील श्री. सुरेश भाटवडेकर व त्यांच्या बँकेत नोकरी करणाऱ्या पत्नी सौ. हेमा भाटवडेकर यांनी हा व्यवसाय सुरू केला. सुरुवातीलाच तांत्रिक आणि आर्थिक मदतीसाठी घेतलेले दोन भागीदार मागे हटले.तरीही सायन्स पदवीधर असलेल्या सुरेशरावांनी जिद्दीने व्यवसाय पुढे नेला. त्यांना साथ दिली ती वाणिज्य शाखेतील द्विपदवीधर व एमबीए केलेल्या त्यांच्या पत्नीने. स्वतःची बँकेतील सुरक्षित नोकरी सोडून त्या सुरेशरावांबरोबर खंबीरपणे उभ्या राहिल्या. व्यवसायाचा व्याप जसा वाढत गेला तसा विरारला एक छोटा फॅक्टरी सेटअप त्यांनी सुरू केला व १९९४ ला व्यवसाय आणखीन वाढवत तारापूरला एमआयडीसी मध्ये मोठा प्लांट सुरू केला.

घरात आई-वडिलांच्या व्यावसायिक चर्चा ऐकतच मोठ्या झालेल्या श्री. जयदीप भाटवडेकर यांचा कल आपोआपच व्यवसायाकडेच वळला. त्यामुळे बीफॉर्म, एमबीए शिक्षण पूर्ण करताच २००२ पासून अर्धवेळ व २००४ पासून पूर्णवेळ त्यांनी व्यवसायातच स्वतःला झोकून दिले. पार्ले टिळकचेच विद्यार्थी असलेले श्री. जयदीप व त्यांची पत्नी कल्पना यांनी जीवनसाहचर्याचा निर्णय हा व्यवसायातही साथ देण्याचे ठरवत घेतला. शिक्षण संपताच दोघांनाही सुरेशरावांनी कामाची संधी दिली. कल्पना या फार्मसीत द्विपदवीधर आहेत. छोटी छोटी लक्ष ठरवून ती पूर्ण करत मोठा पल्ला गाठायचा ही कल्पना यांची मानसिकता, तर आर्थिक, व्यावसायिक आणि मुख्य म्हणजे दर्जाशी १००% इमान राखीत पुढे जाण्याची जयदीप यांची आई-वडिलांकडून घेतलेली मानसिकता यामुळे दोघेही एकमेकांना अतिशय पूरक ठरत आहेत. सुरेशराव व हेमाताई यांचं काम बघत, चर्चा ऐकतच मोठे झाल्याने जयदीप,कल्पना यांना घरातच उत्तम व्यवसाय मार्गदर्शन लाभले. व्यवसायाच्या पायाभूत सुविधा, मालमत्ता, शिस्त ही मागील पिढीने दिलेली देणगी आणि प्रगतीकडे जाण्याचा वेग व दिशा याच मार्गदर्शन यांनी सफलतेचा मार्ग प्रशस्त केला. आता जरी सुरेशराव व हेमाताई व्यवसायातून दूर झाले असले तरी कल्पना जयदिपना त्यांनी खंबीर आधार नक्कीच दिला आहे.





प्रथमपासूनच योग्य व उत्तम मशिनरी आणि त्याच सर्वच कामगारांना, सहकार्यांना योग्य प्रशिक्षण देणे यावर दोघांचाही भर आहे. जयदीप संयोजन, आखणी, योजना यात निपुण आहेत तर कल्पना तांत्रिक बाबींमध्ये. त्यामुळे जयदीप सेल्स, मार्केटिंग, फायनान्स, सप्लाय चेन आदि विभाग सांभाळतात. तर कल्पना मनुष्यबळ, संगणकीय काम, मशीनरीतील अद्यावतता आणि रिसर्च डेव्हलपमेंट हे विभाग सांभाळतात. मात्र या सर्व विभागांचे दर महिन्याला ताळेबंद व शोध घेणे मात्र दोघे इतर सहकाऱ्यांना बरोबर घेऊन एकत्रच करतात.

सिरमॅक्स केमिकल इंडिया ही

पान ४ वर





माझं आयुष्य... माझा आनंद... माझं आकाश... माझी भरारी... हीच तर आहे वीणा वर्ल्ड वुमन्स स्पेशल! वीणा पाटीलच्या संकल्पनेतून साकारलेली, गेली सतरा वर्ष सातत्याने देशविदेशात मनमोकळा विहार करणारी, राज्यांच्या-देशांच्या सीमा पार करीत आत्मविश्वासाने जगाला गवसणी घालणारी वुमन्स स्पेशल फक्त महिलांचीच आवडती आहे असं नव्हे तर तिच्या कुटुंबाच्या प्रशंसेसही ती पात्र ठरली आहे. एका वर्षात पाच ते सहा वुमन्स स्पेशल करणाऱ्या अनेक महिला आहेत. आणखी काय दाखला हवा वीणा वर्ल्ड वुमन्स स्पेशलच्या लोकप्रियतेचा! साइटसीईंग, शॉपिंग, गेम्स, फॅशन शो, म्युझिक-मस्ती-डान्स इत्यादिंनी सजलेली सुनियोजित वुमन्स स्पेशल महिलांनीच एवढी पॉप्युलर केली आहे, की ह्या वर्षी 8 मार्च 'वुमन्स डे' ला देशविदेशात 41 ठिकाणी वुमन्स स्पेशल टूर्सवर सर्व महिला दे धम्माल सेलिब्रेशन करणार आहेत. आता तुम्ही मागे राहू नका, मैत्रिणी/फॅमिली गर्लगँग सोबत धम्माल करा. एकट्या असलात तरी नो एक्सट्रा चार्ज कारण तुम्हाला रूम पार्टनर द्यायची गॅरंटी वीणा वर्ल्डची. निवडा तुमची वुमन्स स्पेशल आणि चला आयुष्य आणखी आनंदी बनवायला, निर्धास्तपणे! संपूर्ण सहलीवर अगदी मुंबई ते मुंबई विमानप्रवासात सुद्धा तुमच्या दिमतीला आहेच वीणा वर्ल्ड टूर मॅनेजर.

'वुमन्स डे' साठी वुमन्स स्पेशल टूर्सचे 41 अफलातून ऑप्शन्स! काश्मीर, राजस्थान, हिमाचल आणि दुबईसाठी पुणे ते पुणे टूर्सही उपलब्ध

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शिमला मनाली 6D/7D-Mar 6/Mar 4 29900 - 37000 | नैनिताल मसुरी हरिद्वार (6D/9D कॉर्बेट) Mar7/Mar6-38K-55K | आसाम मेघालय (8D/12D अरुणाचल) Mar5/Mar2-70K-92K | राजस्थान 6D/8D/9D Mar 5/Mar 4/Mar 2 35000 - 45000 | केरळ (6D/8D/10D) Mar 5/Mar 6/Mar 2 37000 - 55000 | काश्मीर (6D/8D) Mar 5 / Mar 4 50000 - 63000 | दुबई अबुधाबी फेरारी वर्ल्ड बॉलीवूड पार्क(7D)110000 Mar4 (पुणे ते पुणे Mar 6-113000) | सिंगापूर मलेशिया 7 Days - Mar 3 125000 | युरोप-9D/11D/15D May 23/Apr 20/May 17 245000 - 350000 |
| धरमशाला डलहौसी अमृतसर/पालमपुर प्रागपुर 8D - Mar 2 - 50000 | वाराणसी अयोध्या लखनौ (8D) Mar 18 45000 | ऑल ऑफ मेघालय 8 Days - Mar 3 70000 | गुजरात+स्टॅच्यु ऑफ युनिटी (10D) Mar 3 50000 | पाँडिचेरी महाबलीपूरम 5 Days - Mar 4 35000 | लेह नुब्रा पँगाँग (7D/9D कारगिल) May11/May2-61K-70K | श्रीलंका/मॉरिशस 7 Days-Mar 5/Mar4 82000 - 125000 | थायलंड-बँकॉक पट्टाया 6 Days - Mar 4 65000 | ग्रीस विथ ग्रीक आयलंड्स 8 Days Mar 8 - 175000 |
| अमृतसर अटारी वाघा बॉर्डर - 4 Days Mar 6-32000 | इन्दौर/भुवनेश्वर पुरी 5 Days-Mar 5/Mar 13 30000 - 40000 | सिक्किम दार्जिलिंग 7 Days - Mar 5 55000 | कूर्ग मैसूर बेंगळुरू 7 Days - Mar 5 50000 | अंदमान 7 Days - Mar 5 70000 | नेपाल/भूतान (8D/9D) Mar 5/Mar2 65000 - 89000 | अझरबैजान बाकू/इजिप्त 5D/9D - Mar 5 100000 - 150000 | बाली/व्हिएतनाम 7 Days-Mar 4/Mar 7 115000 - 125000 | ऑस्ट्रेलिया 8 Days - May 4 275000 |

मैं हूँ ना!

देशविदेशातील आणखी ग्रुप टूर्स, कस्टमाइज्ड हॉलिडेज, इंडिया इन्बाउंड आणि MICE कॉर्पोरेट टूर्ससाठी आजच veenaworld.com वेबसाईटला भेट द्या.

veenaworld.com • Call: 1800 22 7979 • Mon-Sat 10 to 7 • travel@veenaworld.com

टूर्सच्या सहलखर्चात विमानप्रवास, ट्रान्सपोर्ट, हॉटेल वास्तव्य, ब्रेकफास्ट-लंच-डिनर, एन्ट्री फी सह स्थलदर्शन, ड्राईव्हर-गाईड टिप्स, ट्रॅव्हल इन्शुरन्स*, टूर मॅनेजर सर्व्हिसेस, व्हिसा फी ('फ्री व्हिसा देश' व्यतिरिक्त), आदि गोष्टींचा समावेश आहे

Vile Parle: Sun-Vision Classic, Hanuman Road, Vile Parle (E), Mumbai 400057. Call: 887 997 2213

All group tours are ex-Mumbai. Tour price is per person and on twin sharing basis. These 'Super Deal Tour Prices' are nett and no discount is applicable. At the time of booking, tour price to be paid in full INR by UPI/NEFT/RTGS/Cheque, in the name of 'Veena Patil Hospitality Pvt. Ltd.' No cash transactions at Veena World. Government taxes apply. Any increase in YQ taxes, fuel surcharges, airport taxes, VISA fees will have to be borne by the travellers. T&C apply.

VEENA WORLD
Travel. Explore. Celebrate Life.

पान ३ वरून

## सातत्य, मेहेनत व दूरदृष्टी

भाटवडेकरांची कंपनी २००३ च्याही आधीपासून परदेशी निर्यात करत होती. त्यांची उत्पादने म्हणजे वेगवेगळ्या प्रकारची




जंतुनाशके व निर्जंतुकीकरणासाठी वापरायची रसायने. जंतुनाशके ही मुख्यतः मानवी अथवा सजीवांच्या शरीरावर वापरली जातात. तर निर्जंतुकीकरणाची रसायने ही वेगवेगळ्या पार्श्वभूमीवर (surface) तसेच हवेतील, पाण्यातील जंतुसंसर्ग मिटवण्यासाठी वापरली जातात. त्यामुळे हॉस्पिटल, विमानसेवा, हॉटेल इंडस्ट्री, बीईएसटी, ट्रान्सपोर्ट, पोल्ट्री, कॉस्मेटिक्स, फार्मासिटिकल कंपन्या आदी उद्योग विश्वात जिथे जिथे माणसांचा जास्त वावर आहे तिथे तिथे ती गरजेची असतात. यासाठीची जवळ जवळ १५०/२०० प्रकारची उत्पादने सिरमॅक्समध्ये बनवली जातात. आज देशभरात तर त्यांना मोठी मागणी आहेच.. आज त्यांच्या उत्पन्नातील ६० ते ६५ टक्के उत्पन्न निर्यातीतून येते. याचे मुख्य श्रेय आहे ते भाटवडेकरांच्या दर्जाशी तडजोड न करण्याच्या वृत्तीत. जेव्हा इतर लोक आपल्या मालाची ९९.९% हमी देतात तेव्हा भाटवडेकर आपल्या उत्पादनाची ९९.९९९% हमी देतात. अवघड असा टीबीचा जंतू व फंगसही मारण्याची ते हमी देतात. त्यासाठी त्यांचे प्रत्येक उत्पादन त्यांच्या स्वतःच्या लॅबमध्ये व नंतर मानांकित लॅबमध्ये पुन्हा पुन्हा टेस्ट करूनच विक्रीसाठी आणलं जातं. त्यात मागणीनुसार बनवून दिलेली उत्पादनही आहेत . एकाच उत्पादनाचा सुगंध किंवा रंग बदलल्यावरही त्यात रासायनिक बदल घडू शकतात. म्हणून पुन्हःपुन्हा टेस्टींग करूनच ग्राहकांना पुरवले जाते. आज जवळजवळ ३०० उत्पादनांची लेखी परवानगी त्यांच्याकडे असून फॅक्टरीमध्ये एकाच वेळी पाच वेगवेगळ्या उत्पादनांचे काम चालू असते.

कोरोनाची माहिती व त्याच्या निर्मूलनासाठी लागणाऱ्या उत्पादनांची माहिती व परवानग्या कितीतरी आधीपासून कंपनीकडे होत्या. फक्त त्यावेळी तो भीतीदायक झाला नव्हता. म्हणून जगावर भीषण परिस्थिती येताच कंपनीला पूर्ण ताकदीनिशी उत्पादनात उतरणे शक्य झाले. त्यासाठी कामगार व सहकाऱ्यांची फॅक्टरी व ऑफिसमध्ये राहण्याची व्यवस्था




करणे, त्यांच्यासाठीच्या आरोग्यविषयक नियमांचे पालन करणे, वेळेवर त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक व इतर मदत करणे हे सर्व जयदीप व कल्पनाने कसोशीने केले. नंतर बोनसही दिला. स्टाफसाठी बसेसची सोय केली. त्यासाठी पोलिस व सुरक्षा यंत्रणांशीही लढा दिला. मात्र यावेळी निर्यातीच्या भरपूर संधी असूनही सरकारी बंधनांमुळे पुरेशी निर्यात करता आली नाही. कोरोना काळात व नंतरही गरजेनुसार सॅनिटायझर वापरण्याचे शिक्षण डॉक्टर, नर्सेस व इतर स्टाफलाही त्यांनी दिले.

व्यवसायातून निवृत्त झालेल्या हेमाताई आजही सामाजिक कार्यात मात्र मग्न आहेत. पालघर जिल्ह्यातील २५ गावे त्यांनी दत्तक घेतली आहेत. खेळातून शिक्षण, शिक्षणातून कौशल्य वाढवणे इत्यादी कार्यक्रम त्या राबवतात. शासनाच्या क्षय निर्मूलन कार्यक्रमांतही त्यांचे सक्रिय योगदान आहे. वीस वर्षात १०० कोटींचा पल्ला गाठणारे भाटवडेकर कुटुंबीय सामाजिक भानही उत्तम राखून आहेत.

सतत नवीन नवीन शिकत राहणे, वेगवेगळ्या कायद्यांचा स्वतः अभ्यास करणे, नवीन तांत्रिक व यांत्रिक बदल करत राहणे, कामातील कार्यमग्नता, सातत्य, मेहनत आणि मुख्य म्हणजे दूरदृष्टी व त्यानुसार नियोजन हेच व्यवसाय वृद्धीचे गमक आहे असे जयदीप आणि कल्पना यांचे म्हणणे आहे.



संगीता बेहेरे
९८६७७५८३१०



# पाल्यातिले दिवस

## पार्लेपुराण

मुंबईतल्या पुणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि त्यातही सदाशिव पेठी विलेपार्ले पूर्व येथे माझा जन्म झाला. मागच्या जन्मीचे काही कड़क तप अथवा काही मोठे पुण्यकर्म ह्याला निमित्त मात्र असावे. साधारण २५ ते ३० कॉलेजेस , १५ ते २० शाळा , नाट्यगृह , सिनेमागृह, संस्कार शाळा, व्यायाम शाळा, सांस्कृतिक केंद्रे,अनेकानेक उपहारगृहे काय नाही येथे. इथे आयुष्य व्यतीत करणे ही कुणाही मुंबईकराची परमोच्च सुखाची उपलब्धी असू



शकेल. डिसेंबर महिन्यातील मैजेस्टिक गप्पा असोत अथवा फेब्रुवारीतील वसंत व्याख्यानमाला असो. ऐन दिवाळीतील ग्राहक पेठ असो किंवा रोटरी क्लबचे कार्यक्रम. रसिक पार्लेकरांची गर्दी त्याला अखंड लाभते. ह्या कार्यक्रमाला पार्ल्यातीलच नव्हे तर मुंबईतल्या इतर उपनगरातील अगदी डोंबिवली कल्याण मधील मध्यम वर्गीय या सर्व कार्यक्रमाला अगदी आवर्जून हजेरी लावतात.

ह्या पार्ले गावाला अफाट खाद्य संस्कृति लाभलेली आहे. पार्ल्यातली मंडळी ही जितकी रसिक, तितकीच खाद्य प्रेमीही आहेत. सुरुवात करताना स्टेशनवरील ( स्टेशनवरील ही म्हणायची पद्धत आहे प्रत्यक्षात स्टेशनवरील म्हणजे स्टेशन जवळील असा अर्थ अभिप्रेत आहे) बाजूबाजूच्या पन्नास वर्षाहून अधिक जुन्या अश्या जीवन आणि रामकृष्ण ह्या उपहारगृहांचाच प्रथम उल्लेख करावा लागेल. खाद्य हेच जीवन आहे आणि रामकृष्ण प्राप्तीची वाट ही जीभेमार्गेच पोटात जाते हा आणि केवळ हाच अर्थ ह्यातून अभिप्रेत आहे. छोट्या मोठ्या भूका शांत करण्यासाठी शुक्ला वडापाव, शर्मा भेलपुरी, चव्हाण वडापाव, कच्छी दाबेली, फड़के मिष्टान्न गृह, पंकज फरसाण गृह, ठक्कर , बाबू वडापाव हे आणिक अनेक स्थळे येथे





उपलब्ध आहेत. पार्ल्यापूर्वेतील हनुमान रोड येथील मार्गाचे नाव खाऊगल्ली म्हणून सहज खपून जावे. येथील खाद्यपदार्थ विक्रेत्या घरांची सरासरी काढता साधारण चारास तीन इतकी निघावी. येथील प्रत्येक दुकानातील विशेषातले विशेष पदार्थांचे वर्णन करण्यासाठी विशेष लेखांचेच प्रयोजन करावे लागेल.




कधी कधी मी विचार करतो की मी पार्लेकर झालो नसतो तर कोण बरे झालो असतो. या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या विवंचनेत मी पडत नाही. कधी काळी पार्ल्यातून बाहेर पडून इतर ठिकाणी स्थायिक होण्याचा केवीलवाणा प्रयत्न मी करून पाहिला. पण पार्ल्यातला हवेवर आणि पाण्यावर वाढलेला माझा हा देह तेथील परिस्थीतीशी काही केल्या जुळवून घेऊ शकला नाही.

आजही देवाला प्रार्थना म्हणतानाची एक ओळ ही मला देवाने पार्ल्यात एक मध्यमवर्गीय म्हणून जन्माला घातले म्हणून कृतकृत्य झाल्याची असते आणि पुढला जन्म जर प्राप्त झाला तर तो जन्मही पार्लेश्वराच्या कृपेने केवळ आणि केवळ पार्ल्यातच मिळावा ही असते. एक वेडा पार्लेकर या पेक्षा वेगळ ते काय मागणार हो.



**सी.ए.केदार अनंत साखरदान्डे**
९८३३४ ७७२३३






# क्या से क्या हो गया...

हिंदी चित्रपट सृष्टीतील विरळा असं जुळं गीत गाईड चित्रपटातलं. 'सैंया बेईमान' या नायिकेच्या गाण्याला प्रत्युत्तर म्हणून येणारं..'क्या से क्या हो गया बेवफा तेरे प्यार में'..हे गीत. संगीत दिग्दर्शक सचिन दादा बर्मन यांचा अफाट यशस्वी झालेला गाजलेला आगळा प्रयोग.

मालगुडी डेज् सारख्या सुप्रसिद्ध कादंबऱ्यांचे लेखक श्री. आर के नारायण यांच्या 'द गाईड' या कादंबरीवर आधारित चित्रपट 'गाईड' जो इंग्रजी आणि हिंदी दोन्ही भाषांमध्ये बनला. इंग्रजी चित्रपट सपशेल आपटला. हिंदी मात्र कमालीच्या बाहेर यशस्वी





झाला.

सदाबहार

गाईड राजू आणि प्रौढ आर्किऑलॉजिस्ट मार्को याची नृत्यांगना पत्नी रोझी यांच्या मधील प्रेम कथा. नृत्याची मनापासून ओढ असणारी रोझी अरसिक मार्कोसह लग्नसंबंधात घुसमटते आहे. एका क्षणी न आवडणाऱ्या नवऱ्याच्या बंधनातून मुक्त होऊन आपले विवाहबंध झुगारुन राजूकडे येते. राजू तिला यशस्वी नृत्यांगना म्हणून प्रस्थापित होण्यास मदत करतो. सुरुवातीचे गुलाबी दिवस हळूहळू सरत जातात. राजूला दारू आणि जुगाराचे व्यसन लागते. रोझी राजूला झिडकारते. एकमेकांवर प्रचंड प्रेम करणारे हे जीव एकमेकांमुळे दुखावले जातात, एकमेकांपासून दूर जातात. अशा प्रसंगी



चित्रपटात हे गीत येतं. वहिदा रहमान यांच्या अप्रतिम नृत्याविष्कारात नटलेलं, लताबाईंच्या मधुर स्वरसाजात सजलेलं 'सैंया बेईमान' हे गीत रोझीची मनस्थिती व्यक्त करतं, कथा व्यक्त करतं. त्या पाठोपाठ येणारं मोहम्मद रफी यांच्या मखमली स्वरातील 'क्या से क्या हो गया' हे गीत राजूच्या मनाची खंत व्यक्त करतं, ऐकणाऱ्यालाही व्याकुळ करतं. दोन्ही गीतं झिंझोटी रागातील एकाच चालीत बांधली आहेत.

चित्रपटातील या दोन्ही गीतांसह पिया तोसे, तेरे मेरे सपनें, काटों से खिंचके... अशी सगळीच



एक से एक गीतं गाजली. सचिन दादा बर्मन यांच्यासह या सगळ्या गीतांचे श्रेय गीतकार शैलेंद्र यांचंही आहे. चित्रपटाचं नृत्य दिग्दर्शन, सरोज खान यांचे पती सोहनलाल यांचं आहे.

गीत सुरू झाल्यावर.. 'चाहा क्या'..या ओळींच्या वेळी देवानंद यांचे दोन्ही हात वर येतात मध्ये वहिदा यांची प्रतिमा. पुढच्याच.. 'क्या मिला'..या ओळींच्या वेळी मनगटात बेडी येते. अप्रतिम कल्पक दिग्दर्शन विजय आनंद यांचं. देव आनंद यांच्या नवकेतन फिल्म कंपनी निर्मित नौ दो ग्यारह गाईड, काला बाजार अशा अनेक चित्रपटांचं त्यांनी दिग्दर्शन केलं आणि हे चित्रपट अफाट गाजले. फ्रेम टू फ्रेम नितांत सुंदर असलेल्या, चित्तोड गड राजस्थान आणि अहमदाबाद इथे काही भागाचं चित्रीकरण झालेल्या या चित्रपटाला फिल्मफेअरची १४ नामांकने मिळाली. उत्कृष्ट चित्रपट, दिग्दर्शक, नायक, नायिका, संगीत असे सात पुरस्कार या चित्रपटाने जिंकले.

अतिशय गाजलेल्या अशा या गीताची लिंक सोबत देत आहे.

https://youtu.be/vTTWTQa3H1E



अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

**पालघर येथील जागा : खरेदी - विक्रीसाठी**

**नवलनगर, शेलवली, नवलनगर, पालघर (पूर्व)**
**मिनू-मिटु नगर, पालघर (पूर्व)**
**येथील निवासी प्लॉट्स विकणे, विकत घेणे**
**तलाठी टॅक्स किंवा संबंधीत कामे,**
**वारसाची नावे चढविणे, ७/१२ उतारा**
**अपडेट करणे, सिटी सर्वे, फेन्सिंग**
**प्लॉटवरील अतिक्रमण हटविण्यासाठी**
**मदत करणे इत्यादी संबंधीत कामे**
**माफक दरात करण्यासाठी.**

**संपर्क: श्री. संजय गायकवाड (पालघर)**

**9224448133**
**9823632384**

**पूर्व-नियोजित अपॉईंटमेंट घेतल्यास**
**मंगळवार आणि शुक्रवार विलेपार्ले येथे भेटू शकतात.**
**अधिक माहीतीसाठी.**

**संपर्क : 9833688593 → विलेपार्ले (पूर्व)**

## वैशाली सामंत हिला मिळाला अनोखा मान

वैशाली सामंत ही एक लोकप्रिय पार्श्वगायिका, संगीतकार आहे. हिंदी आणि मराठी चित्रपटांमध्ये तसेच स्वतंत्र संगीत अल्बममध्ये तीने पार्श्वगायन केले आहे.

२५ जानेवारी २०२३ रोजी राष्ट्रीय मतदार




दिनानिमित्त भारताच्या माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिग्दर्शक सुभाष घई यांनी तयार केलेल्या गाण्याचे उद्घाटन करण्यात आले. व्हिस्लिंग वुड्स इंटरनॅशनल स्कूल ऑफ म्युझिक, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट निर्माते सुभाष घई यांनी लिहिलेल्या आणि संगीतबद्ध केलेल्या प्रेरणादायी मैं भारत हूँ - भारत है मुझमे - हम भारत के मतदाता हैं - मत देना जानेंगे भारत के लिए...गीतांवर हिंदी आणि भारतातील प्रादेशिक भाषांमध्ये भारतातील १८ ख्यातनाम गायकांनी सुंदरपणे हे गाणे गायले आहे. त्यातील महाराष्ट्राची संस्कृती दर्शविणारी मराठी भाषेतील गाणे गायचा मान हा वैशाली सामंत यांना मिळाला.

**वैशाली सामंत यांचे मनोगत**

'माझ्यासाठी फार अभिमानाची गोष्ट आहे की इतक्या महत्वाच्या गाण्यासाठी महाराष्ट्रातून माझी निवड व्हावी.

साक्षात आपल्या राष्ट्रपती माननीय द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हे गाणं release होणे हा फार सुंदर योग होता.

# रंगुनी रागांत साऱ्या

## पीलू

नावाप्रमाणे एकदम आवडून गेलेला राग म्हणजे पीलू. गोड पिलू जसं आपल्याला आवडते तसाच हा राग. अभिजात संगीतात थोडा सोपा समजला जातो बहुतेक. फार बंदिशी लोकप्रिय नाहीत पण ठुमरी मात्र खूप आहेत. काफी थाटातला अतिशय गोड राग. संध्याकाळी गायला जातो.

चित्रपट संगीतात अत्यंत लोकप्रिय. मराठी, हिंदी आणि इतर भाषांमध्ये सुद्धा प्रसिद्ध. खूप कर्णमधुर असल्यामुळे या रागात बहुतेक संगीतकार आपले नशीब आजमावतात. एक खट्याळ, प्रेमळ, नैसर्गिक खेळकर असा मूड सहज तयार करणारा राग. पूर्वीपासून खूप लोकप्रिय गाणी यात आहेत.

'धुंडो धुंडो रे साजना मोरे कान का बाला', गंगा जमुना 'कभी आर कभी पार लागा तीरे नजर', 'काली घटा छाये मोरा जिया तरसाये'.'जाईये आप कहा जायेंगे', 'ना जाओ सैया छुडाके बैया' सर्वच गाणी अप्रतिम.

अगदी रोमँटिक 'चुरा लिया है तुमने जो दिलको 'सुद्धा त्यातलंच. अभिमान मध्ये सर्वच गाणी सुंदर होती. त्यातलं पहिलं जया भादुरी वर चित्रित 'नदिया किनारे हेरायी आई कंगना 'एक फ्रेश मूड आणते. गोड, खेळकर, सुमधुर आणि सतगुणी मुलीचं introduction या गाण्याने पटकन होत.

मराठी सिनेमात जगण्याचे ज्ञान द्यायला हाच राग. 'अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर '. आपण नकळत असलेल्या परिस्थितीत आनंदी रहाणारी माणसं स्वतः होऊन जगतो.


मला खात्री आहे कि भगवान श्रीकृष्णांवर सगळ्यात जास्त गाणी, रचना असाव्यात. त्याने काढलेल्या खोडयांचेही कौतुकच झालं. बऱ्याच लोकांना त्याचा हेवा नक्की वाटत असेल. म्हणजे गोपी नाहताना त्यानी गोपींचे कपडे पळवायचे आणि गोपींनी विनवण्या करायच्या. 'दे रे कान्हा चोळी लुगडी '. आता कान्हा काही कपडे देत नाही आणि गोपी पाण्याच्या बाहेर येऊ शकत नाहीत, हा तिढा सोडवायचा तरी कसा? पुढे काय झाले असेल यावर असंख्य मते आणि काव्यं आहेत. असो. पिंजरा चित्रपटातील हे या रागातील गाणे अजून नक्की लक्षात असेल.

एका गाण्याचं मात्र साधारणपणे मला अजीर्ण झालंय आता. बलराज सहानी चे 'ओ मेरी जोहराजबी, तुम्हे मालूम नही '. कुठेही थोडं मॅच्युअर्ड प्रेम दाखवायचं कि दुसरं गाणंच दिसत नाही लोकांना. पन्नास वर्ष तेच गाणे. असेल ते पीलू मध्ये पण किती अतिरेक तो.

एखादे दुःखी गाणेसुद्धा आहे या रागात. 'बहारोने मेरा चमन लुटकर'. पण exception. काही काही अतिशय intense गाणी आहेत. 'सूर ना सजे क्या गाऊ मै ' किंवा बंदिनी मधले 'अबके बरस भेज भैय्या को बाबूल'.

एक फार सुंदर गाणे इलायराजा च्या संगीत दिग्दर्शनमध्ये. सदमा मधील 'सुरमई अखियोंमे नन्हा मुन्ना एक सपना दे जा रे'. खेळकर, छान लोरीच्या सुरावटीत डोळ्यात पाणी आणणारे एकमेव गाणे

भारत भूषण या नटाला अनेक छान गाणी मिळाली आहेत या रागात. बऱ्याच लोकांचा त्याच्यावर विशेष राग आहे कारण त्याच्या समोर खूप वेळा मधुबाला असायची. 'पिया पिया ना लागे मोरा जिया' असे मधुबाला म्हणत असताना तो स्ट्रॉ ने कोक प्यावा अशी बासरी वाजवतो, दुसऱ्या चित्रपटात, बरसातकी रात मध्ये, परत राग पीलू, त्याला असा प्रश्न पडतो. 'मैने शायद तुम्हे पेहले भी कंही देखा है'. एकदा मधुबालाला ओझरतं सुद्धा बघितल्यावर तिला विसरणं शक्य आहे का? असो.





मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८

# महाराष्ट्राला जिमनॅस्टीकमध्ये सुवर्णपदक





नुकत्याच केरळ येथील त्रिवेंद्रम शहरात ज्युनिअर जिमनॅस्टिकच्या स्पर्धा पार पडल्या. यात १६ राज्याच्या सुमारे ३०० स्पर्धकांनी भाग घेतला होता. महाराष्ट्राच्या ज्युनिअर संघात निशांत करंदीकर, सार्थक राऊळ, अनुष्का पाटील व निती दोशी या सर्वांनी महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करीत महाराष्ट्राला पहिल्यांदाच पुरुष आणि महिला दोन्ही गटात राष्ट्रीय स्तरावर चॅम्पियनशिप मिळवून सुवर्ण पदक कमावले. या स्पर्धेत सार्थक राऊळ याने वैयक्तिक दुसरा क्रमांक सुद्धा पटकावला, यामुळेच फेब्रुवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात मध्यप्रदेश मध्ये होणाऱ्या खेलो इंडिया युथ स्पर्धेसाठी या चौघांची निवड झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती (रजि.) संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू, सचिव डॉ. मोहन अ.राणे, जिम्नॅस्टिक्स प्रमुख नीलम बाबरदेसाई, सर्व विश्वस्त आणि पुरुष प्रशिक्षक शुभम गिरी तसेच महिला प्रशिक्षक विशाल कटकदौंड यांचे मोलाचे सहकार्य या खेळाडूंना मिळत आहे.

# जागतिक मराठी दिवस



साथ संगत महिला मंडळ आणि प्रबोधनकार ठाकरे यांच्या संयुक्त विद्यमाने दर वर्षी जागतिक मराठी दिवस साजरा केला जातो. विलेपार्ले परिसरातील सारी महिला मंडळे यात सहभागी होतात. अगदी कोविड काळातही मराठी दिन ऑनलाईन साजरा केला गेला. मागच्या वर्षी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त पार्ल्यातील पंच्याहत्तर महिलांनी पंच्याहत्तर स्वातंत्र्यसैनिकांबद्दल माहिती सांगून व्हिडिओ तयार केले. ते मंडळाच्या संचालिका सौ. चित्रा मेहेंदळे यांच्या Enthu CM या युट्यूब चॅनेल वरील 'क्रांतीचा जयजयकार' या प्लेलिस्ट मध्ये अपलोड केले आहेत. लिंक सोबत दिली आहे.
https://youtube.com/playlist?list=PLHVloS5bmjagEWRx5iV8DYFVmybbq69lw

या वर्षी 'मराठीतील नवीन लेखक / लेखिका' असा विषय घेतला आहे. सर्वांसाठी हा कार्यक्रम खुला आहे. सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. ज्यांची इच्छा असेल त्यांनी वर्गणी भरून साथ संगत मंडळाचे सभासद व्हावे.

दिनांक : २८.०२.२०२३

स्थळ : प्रबोधनकार ठाकरे क्रीडासंकुल येथील कलादालन

वेळ : संध्याकाळी ४ ते ७

## 'मैं तो चला'- तेजस भावे

तेजस पुस्तकांत फारसं डोकं घालणारा कधीच नव्हता, परंतु लोकांना एकत्र करून, पुढाकार घेऊन काहीतरी करण्याची प्रचंड आवड. त्यात खेळातही चांगला. १९८४ सालचा हा मुलगा मागच्या पिढीत जन्मला असता तर आईबापांनी त्यास अभ्यास करून कुठेतरी नोकरीला चिकट म्हणून नक्कीच भंडावून सोडले असते.



पण सुदैवाने तेजस हा 'नवउद्योजक' तरुण मानसी-मोहन भावे या दांपत्याच्या पोटी जन्मला आणि त्यास जे नवेनवे करून पाहायचे होते त्यात आईवडिलांचा पूर्ण पाठिंबा लाभला.

तो पार्ले टिळक मराठी माध्यमात शिकला. इंग्रजी माध्यमात मुलांना घालण्याची प्रचंड लाट असतानाही आईवडिलांनी त्यास मराठी माध्यमात घातले हे कौतुकास्पदच. पार्ल्यातील रीतीरिवाजानुसार तो डहाणूकर कॉलेजात गेला. पदवीनंतर मुंबई विद्यापीठातून एमबीए मार्केटिंगचे शिक्षण घेतले. जाहिरात एजन्सीत नोकरी धरली. अडीच वर्षे नोकरीचा अनुभव घेतल्यावर स्वतःचा व्यवसाय असावा असे वाटू लागले आणि 'थिंक-कॅनव्हास' डिझाईन एजन्सीचा जन्म झाला. आज तो थेट ग्राहकांना सेवा देतो तसंच मोठ्या एजन्सींचे प्रोजेक्ट बेसिसवर कामही करतो. या धडपडीच्या काळात त्यानं कॅफे/रेस्टॉरंटच्या व्यवस्थापनातही भाग घेतला होता. तोही सात आठ वर्षांचा अनुभव त्याच्या गाठीशी आहे. त्यामुळे जाहिरात एजन्सीसोबतच नवीन रेस्टॉरंट स्थापनेविषयीची कन्सल्टन्सीचे काम करून तो आपल्या अनुभवाचा फायदा अन्य नवउद्योजकांना देत असतो. हे झाले रोजच्या व्यवसायाबद्दल पण त्याशिवाय----

तेजस उत्तम बॅडमिंटन खेळतो. शाळेतून त्यानं राज्य स्तरावर बॅडमिंटन सिंगल्समध्ये भाग घेतला होता. पार्ले महोत्सवात बक्षिसंही मिळवली होती. परंतु पुढे अभ्यास-पदवी-नोकरीचे व्याप सुरू झाले, त्यामुळे खेळ काही काळ मागे पडला. पण पंचविशीत स्वतःचा व्यवसाय सुरू केल्यावर या आवडीने पुन्हा उचल खाल्ली आणि तेजसने फिटनेस लेव्हल वाढवून बॅडमिंटन क्षेत्रात प्रवेश केला. सध्या तो महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचा मान्यताप्राप्त अंपायर आहे. पुलैला गोपीचंद गुरुकुल अकादमीत त्यानं कोचिंगचे प्रशिक्षण पूर्ण केले असून तो त्यांच्या एमसीए-वांद्रे येथे बॅडमिंटनचा कोच म्हणूनही जातो.

सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे त्याने 'मेराकी' नामक संस्था पत्नी सई चितळे, भाग्यश्री महाजन आणि शिल्पा देशिंगकर यांच्यासह काढली आहे. क्रेन मॅरॉथॉनसारख्या उपक्रमांद्वारे रूग्णालयांचे सुशोभीकरण, कॉर्पोरेट कीर्तन असे कार्यक्रम ते करतात.

आत्तापर्यंत केलेल्या प्रगतीत आणि धडपडीत आई-बाबा, पत्नी सई आणि सासूसासरे यांनी सदैव पाठिंबा दिला म्हणून तो कृतज्ञ आहे. ते पाठीशी उभे राहिले नसते तर यातले काहीच करता आले नसते हेही तो नम्रपणे नमूद करतो. सध्या त्याच्या आणि सईच्या संसारात राघव नामक एका छोट्या-दत्तक बाळाचे आगमन झाले आहे. तेजसला आणि त्या सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.



**सविता दामले**
९९३०३ ११५४६

## श्री कर्नल संदीप अ. पेंडसे यांना मानाचा सन्मान



पराजपे विद्यालय, अंधेरी या शाळेचे १९९१ च्या बॅचचे माजी विद्यार्थी कर्नल संदीप पेंडसे यांना विशिष्ट सेवा मेडल व्हीएसएम (VSM) हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे. सशस्त्र दल विभागातील 'Distinguished service of a High order' यासाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त दरवर्षी सशस्त्र दलांसाठी विविध सन्मान आणि पुरस्कार जाहीर केले जातात.

लष्कराच्या मुख्यालयात गेल्या तीन वर्षांत कर्नल संदीप यांनी नवीन लढाऊ गणवेश निर्मितीसाठी केलेल्या महत्वाच्या कामासाठी हा पुरस्कार देण्यात येत आहे. प्रत्यक्ष पुरस्कार प्रदान सोहळा वर्षाच्या शेवटी होईल.

हा पुरस्कार भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान केला जातो.

श्री कर्नल संदीप अ. पेंडसे यांचे पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन परिवारातर्फे खूप खूप अभिनंदन! आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा .






## पार्ले 'वॉकेथॉन' ला उत्स्फूर्त प्रतिसाद

विलेपार्ले येथे ऐन थंडीत नागरिकांचा विलेपार्ले 'वॉकेथॉन' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद .

विलेपार्ले येथे ज्येष्ठ नागरिकांचा 'वॉकेथॉन' विलेपार्लेतील एक ज्येष्ठ नागरिक व स्वा. सावरकर सेवा संघाचे सहकार्यवाह शरद पटवर्धन



यांच्या संकल्पनेतून २०१७ साली सुरू केलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी विनामूल्य वॉकेथॉन ह्या उपक्रमांचे रविवार दिनांक २२ जानेवारी २०२३ रोजी पाचवे वर्ष मोठ्या उत्साहात संपन्न झाले. ३२५ ज्येष्ठ नागरिकांनी सकाळी सहा वाजता सावरकर सेवा केंद्रात ऐन थंडीत नोंदणी करून २ किंवा ४ किलोमीटर एकत्र चालण्याचा आनंद घेतला. यावर्षी वीणा वर्ल्ड या प्रसिद्ध पर्यटन संस्थेचे मुख्य प्रायोजक म्हणून सहकार्य लाभलं.

या उपक्रमाला इतरही अनेक संस्थांचे योगदान लाभलं . सकाळी चालायला प्रारंभ करण्यापूर्वी काही मान्यवरांचा व प्रायोजकांचा सत्कार करण्यात आला. स्थानिक आमदार अ‍ॅड. श्री पराग अळवणी, लोकमान्य सेवा संघाचे अध्यक्ष (उ.अ.) श्री मुकुंद चितळे, नगरसेवक श्री अभिजीत सामंत व डॉक्टर अविनाश ठाकूर देसाई (च.ड.) सावरकर सेवा केंद्राचे कार्याध्यक्ष श्री सुभाष पेठे यांनी जेष्ठ नागरिकांना शुभेच्छा दिल्या व बाहेर महात्मा गांधी रोड येथे मान्यवरांनी Flag Off करून नागरिकांनी चालायला आरंभ केला. परत आल्यानंतर सर्वांना धनश्री कॅटरर्स तर्फे उपमा व चहा/ कॉफी देण्यात आली. तसेच विणा वर्ल्ड तर्फे भेटवस्तू देण्यात आल्या. सेल्फी पॉईंट वर सहभागी नागरिकांनी फोटो काढून परस्परांशी गप्पा मारून त्यांना आनंद झाल्याचं समाधान आयोजकांना मिळालं.

# कवितेची गोष्ट

संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञात असलेली ही नितांत सुंदर कविता मी असंख्य वेळा अनेकांच्या तोंडून ऐकली आहे. स्थळकालातीत असं हे काव्य ऐकल्यावर दर वेळी एक रुखरुख मनाला लागून राहते. जाता जात नाही. अजूनही या कवितेच्या माझ्या मनातल्या नायकाला न्याय मिळालाय असं मला वाटतं नाही कारण कवितेच्या त्या धीरोदात्त नायकाची गोष्ट मला दिसू लागते, लपलेले तपशील माझ्या डोळ्यासमोर येऊ लागतात ते असे.

होतं नव्हतं ते नेणाऱ्या गंगा माईला अवखळ माहेरवाशीणीची उपमा देणारा, 'बायको मात्र वाचली 'या सकारात्मक वाक्यातून वाहून गेलेल्या एखाद दुसऱ्या पोटच्या गोळ्याचं दुःख लपवणारा, डोळ्यातील पाण्याला प्रसाद म्हणून स्वीकारणारा तो ताठ कण्याचा नायक नक्कीच

### कणा

*ओळखलंत का सर मला, पावसात आला कोणी*
*कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी*

*क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून*
*गंगामाई पाहुणी आली गेली घरट्यात राहून*

*माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतींत नाचली*
*मोकळ्या हाती जाईल कशी बायको मात्र वाचली*

*भिंत खचली, चूल विझली होते नव्हते गेले*
*प्रसाद म्हणुन पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले*

*कारभारणीला घेऊन संगे सर आता लढतो आहे*
*चिखलगाळ काढतो आहे, पडकी भिंत बांधतो आहे*

*खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला*
*पैसे नकोत सर जरा एकटेपणा वाटला*

*मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा*
*पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा!*

- कुसुमाग्रज

शाळा कॉलेज मधला उत्तम विद्यार्थी असणार. अगदी अभ्यासात चमकणारा नसला तरी वक्तृत्व स्पर्धा किंवा खेळाची मैदानं गाजवणारा, जिगरबाज असाच माझ्या डोळ्यांसमोर येतो. परिस्थितीशी दोन हात करताना काही कामानिमित्त तो जिल्ह्याला आला असावा. कदाचित सरकारी मदतकार्याच्या संदर्भात. अचानक त्याला आठवलं असावं की आपले सर इथेच राहतात. भेटूया आलोच आहोत तर. शाळेच्या रम्य आठवणीत थोडा विसर पडेल दुःखाचा. त्याला वाटणारा एकटेपणा हा बराच काळ सुखाच्या क्षणांना वंचित राहिल्यामुळे आलेला असावा . अनेक पूरग्रस्तापैकी तो एक. स्वतःची अशी वेगळी ओळख पुसली गेलेला. पदोपदी अपमानित झालेला. स्वतःच्या दुःखाविषयी बोलायचं नसावच त्याला पण अनवधाने वाचा फुटली दुःखाला. काय करणार तो तरी. बोलणार कुणाशी ? आजुबाजूला सर्वच जण थोड्या फार फरकाने त्याच दुःखात बुडालेले. आपल्याला खऱ्या अर्थाने ओळखणाऱ्या कोणाशी तरी त्याला फक्त बोलायचं होतं.

म्हणूनच सरांचा हात खिशाकडे जाताच तो 'हसत हसत उठला'. यातले 'हसत हसत' शब्द फसवे तर 'उठला' शब्द महत्वाचा. तो उठला कारण आता तिथे त्याला क्षणमात्र बसायचं नव्हतं आणि त्याच्या हसण्यात जगभरातील खिन्नता भरली असावी की 'सर, मला वाटलं की तुम्ही तरी मला ओळखाल. पैशांच्या अपेक्षेने मी बोलत होतो असं तुम्हांला वाटलं तरी कसं ? . माझ्या पहिल्या प्रश्नाचं उत्तर मला मिळालं सर. तुम्ही नाही ओळखलंत मला. आता मी इथं क्षणभरही थांबू शकत नाही.' त्यानंतरची ' पाठीवरती हात..' वगैरे त्याची निव्वळ नम्रता व सरांबद्दलचा आदर आहे. सरांच्या आशीर्वादाची त्याला तशी गरज नाही. त्यासाठी तो आलाच नव्हता. स्वयंप्रेरित आहे तो.

इथं सरांचा हात खिशाकडं जाणं ही बाब अत्यंत स्वाभाविक व संवेदनशील माणसाचीच आहे. पण तरीही थोड्या कोरड्या व्यवहाराची आहे. इथं त्याचं आभाळ फाटलंय!! ते सांधायला त्याला अजून एका ठिगळाची नाही तर त्या पलीकडच्या खोल प्रामाणिक दिलाश्याची गरज आहे ज्याने त्याचं एकटेपण थोड्या वेळाकरिता कां होईना पण दूर होईल. अभावितपणे खिश्याकडे हात नेण्याच्या एका कृतीमुळे तो पुन्हा बिन चेहऱ्याच्या दीनवाण्या पूरग्रस्तांच्या कळपात ढकलला गेला. या काव्याची थोरवी हीच की कधी कधी सामान्य माणुसकी पलीकडची संवेदना, अंतर्मुखी जाणीव असणं किती महत्वाचं आहे हेच ते सांगतं. असं असून सुद्धा 'पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा 'ही ओळ अत्यंत भावुकतेने व अत्यादराने म्हटली जाते. तिच्यात नायकाचा अपेक्षाभंग, वैषम्य याचा मागमूस नसतो. जणू काही नायक स्फूर्तीसाठी, त्या आशिर्वादासाठीच तिथे आला होता. त्यानं नायकाचं नायकत्व मात्र विनाकारण थोडं कमी होतं ही माझी रुखरुख.



प्रसाद आठल्ये
९८२०६ १३४४५

HAVE YOU REGISTERED?
पार्ले BAZAAR
IF NOT, THEN JOIN NOW!
www.parlebazaar.com
Vileparle's Own Business Platform

Features of Website:
• Section-Wise Web Directory with contact details of Professionals and Business Units
• Check Upcoming Real Estate Projects, Buy Sell Rent Properties
• Upcoming Tours.
• Dramas, Events, Movies Etc. in Vile Parle
• Various Sections like Finance, Education, Travel, Health, Food, Property, Fashion, Matrimony, Tech & many more.
• Blogs written by Experts

Advertisement Options :
Banners, Classifieds, Listing with Page, Deals etc.

CONTACT FOR ADVT.:
9769261182 | 8169825961 | 8779659843 | 8104286202.
Email id: marketing@parlebazaar.com
FOLLOW US ON: @parlebazaar

## डॉ. रमेश शांताराम चौघुले यांना जीवन गौरव पुरस्कार

मुंबईतील नामांकित सोसायटी फॉर कॅन्सर रिसर्च अ‍ॅण्ड कम्युनिकेशनफ या संस्थेने



त्यांच्या २४ व्या वार्षिक पारितोषिक समारंभात डॉ. रमेश चौघुले यांचा यथोचित गौरव करून त्यांच्या कॅन्सर या विषयावरील पुस्तकाला २०२२ चे उत्कृष्ट पुस्तक म्हणून गौरविले. ते ८४ वयाचे असून त्यांच्या कॅन्सर वरील संशोधनाला ५० वर्षे पुर्ण झाल्याबद्दल त्यांना जीवन गौरव पुरस्कार मुंबईतील सन अ‍ॅण्ड सैन्ड हॉटेलमध्ये दि. २६ जानेवारी २०२३ रोजी प्रदान केला गेला. Nanomaterials for cancer detection using imaging techniques and their clinical applications असे पुस्तकाचे नाव असून ते स्प्रिंगर नेचर स्विझर्लंड या संस्थेने प्रकाशित केले आहे. दोन्ही पुरस्कार संस्थेचे पदाधिकारी नानावटी रुग्णालयाचे मेडिकल डायरेक्टर डॉ. पाटकर आणि ऑन्कोलॉजी डिपार्टमेंटचे मुख्य डॉ. नागराज हुईलगोल्ड यांच्या हस्ते प्रदान झाले.

डॉ. रमेश चौघुले टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या मुंबईच्या नामांकित संस्थेत ज्येष्ठ शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते. निवृत्ती नंतर मुंबईतील रामनारायण रुईया कॉलेज येथे आमंत्रित प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा मुख्य विषय नॅनो टेक्नॉलॉजी हा असून त्यांच्या आतापर्यंत ८ पुस्तकांचे परदेशात प्रकाशन झाले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी हाच विषय घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट प्राप्त केली आहे. आतापर्यंत १०० च्यावर शोध निबंध त्यांच्या नावावर आहेत. अनेक देशात त्यांनी संशोधनावर काम केले आहे.

मनोरंजन विश्व

## घोडा

मराठी चित्रपटांचे विषय हल्ली वैविध्यपूर्ण असतात, असा प्रत्यय येतो. अनेक महोत्सवातून दाखल झालेला 'घोडा' हा चित्रपट या महिन्यात प्रदर्शित होतोय. बांधकाम मजुराचा मुलगा शेजारी राहणाऱ्या मुलासाठी आणलेला घोडा पाहून तसा घोडा आणण्याची मागणी करतो. पण आर्थिक परिस्थिती बिकट असलेले त्याचे वडील काय धडपड करतात त्याची गोष्ट 'घोडा' या चित्रपटात मांडण्यात आली आहे.एखादा माणूस स्वप्नपूर्तीसाठी कशी धडपड करतो, हे देखील याचित्रपटात पाहायला मिळणार आहे. टी. महेश फिल्म्सच्या टी. महेश आणि अनिल बबनराव वणवे यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. तसेच उमेशचंद्र शिंदे आणि नयन चित्ते सहनिर्माते आहेत. चित्रपटाचं दिग्दर्शन टी. महेश यांनी केलं आहे. अभिनेता कैलास वाघमारे, अर्चना खारतुडे, दिलीप धनावडे, राहुल बेलापूर, शिवराज नाळे, देवेंद्र देव, प्रफुल्ल कांबळे, वज्र पवार यांच्या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत.जमीर अत्तार यांनी या चित्रपटासाठी कथा आणि गीत लेखन केले आहे तर महेशकुमार मुंजाळे, जमीर अत्तार आणि निलेश महिगावकर यांनी पटकथा लेखन आणि संवाद लेखन केले आहे. निलेश महिगावकर, योगेश एम. कोळी यांनी छायांकन केलं असून रोहन पाटील यांनी संकलन केले आहे.




## आलंय माझ्या राशीला

राशीभविष्य हा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय असतो आणि त्या संदर्भातील गंमती जमती वाचायला, ऐकायला, पाहायला आपल्याला आवडत असतं. बारा राशींच्या आगळ्या वेगळ्या गोष्टी सांगणारा चित्रपट 'आलंय माझ्या राशीला ' याचमहिन्यात प्रदर्शित होत आहे. मुख्य म्हणजे वास्तुतज्ज्ञ ज्योतिर्विद आनंद पिंपळकर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. आनंदी वास्तू आणि साईकमल प्रोडक्शन निर्मित आणि फिल्मास्त्र स्टुडिओ प्रस्तुत आलंय माझ्या राशीला या चित्रपटाचे निर्माते आनंद पिंपळकर आणि अश्विनी पिंपळकर आहेत.


चित्रपटाचं दिग्दर्शन अजित शिरोळे यांनी केलं आहे.

आनंद पिंपळकर सांगतात की, आजवर मी वास्तूविशारद व ज्योतिषी म्हणून असंख्य जणांना मार्गदर्शन केलं पण चित्रपटाच्या माध्यमातून राशींच्या गमतीजमती प्रेक्षकांसमोर अधिक चांगल्या रीतीने दाखवता येतील या उद्देशाने मी या चित्रपटाची निर्मिती केली असून एका विशेष भूमिकेमध्ये मी यात दिसणार आहे. मराठीतील अनेक दिग्गज कलाकार या चित्रपटात असून त्यांच्या सोबतीला माझ्या मुलाचं प्रणवचं अभिनयाचं स्वप्न या चित्रपटाने साकारलं आहे. वैमानिक असलेल्या प्रणवला अभिनयाची आवड आहे. ही आवड पूर्ण करण्यासाठी त्याने 'आलंय माझ्या राशीला' या चित्रपटात भूमिका साकारली आहे.'

प्रणव पिंपळकर या चित्रपटातून या क्षेत्रात पदार्पण करत आहे . चित्रपटातचिन्मय मांडलेकर, अलका कुबल-आठल्ये , मोहन जोशी, निर्मिती सावंत, अतुल परचुरे, प्रसाद ओक, मंगेश देसाई, उषा नाईक, भार्गवी



चिरमुले, अश्विनी कुलकर्णी, पौर्णिमा अहिरे, दिगंबर नाईक, संग्राम चौगुले, स्वप्निल राजशेखर, सिद्धार्थ खिरीड यांच्या भूमिका आहेत. या चित्रपटाचे लेखन हेमंत एदलाबादकर यांनी केलं आहे. सहनिर्माते दिलीप जाधव आहेत.



**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

# पाहुणा पाल्याचा

**★★मुक्त व्यासपीठ...**

माया माध्यमांची...श्री दिनकर गांगल.★★ ज्येष्ठ पत्रकार व संपादक -थिंक महाराष्ट्र- वेब पोर्टल.

गांगलसरांनी अवघ्या २०-२५ मिनिटांत विविध माध्यमांची सापेक्षता व त्यांचं मायाजाल यावर भाष्य केलं. वास्तविक विषय खूप गहन..पण कैक शतकांचा माध्यममायेचा आढावा घेणं ही एका पूर्ण कार्यशाळेची थीम असू शकते. पण त्यांच्यासारख्या अनुभवी तज्ञाने त्याचं सार सांगण्याचा नेटका प्रयत्न केला..

प्रमुख पाहुणे - डॉ. सदानंद दाते..अप्पर पोलीस महासंचालक (दहशतवाद विरोधी पथक)★

**श्रेयस की प्रेयस...**

की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने, लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग माने! जे दिव्य दाहक म्हणुनी असावयाचे! बुद्ध्याची वाण धरिले करि हे सतीचे ...इति स्वातंत्र्यवीर सावरकर..

आपण सर्वच सावरकर होऊ शकत नाही. पण दातेसरांसारखी ध्येयासक्त व्यक्ती तो मार्ग निश्चितच अनुसरते..

त्यांच्याशी संवादाचा प्रारंभच सर्वांच्या काळजात धडकी भरवणारा व एक महाआपदेप्रमाणे कायम लक्षात राहणाऱ्या २६/११ चा मुंबईवरचा दहशतवादी हल्ला..त्याला पोलीसदलाने दिलेली रोमहर्षक झुंज..

कोणताही अभिनिवेश न आणता ..दातेसरांनी हे भय नाट्य आम्हा प्रेक्षक श्रोत्यांना कथन केलं..जिहादी हेतूने आलेल्या अतिरेक्यांना



संयमाने प्राणाची पर्वा न करता जेरीस आणलं गेलं..सहकाऱ्यांचे बळी जात असताना बहुजनांचे जीव वाचवता आले ..हे समाधान की कायम बोचणारी सल...ही दुविधा अस्वस्थ करणारीच..

सर्व रसिक प्रेक्षक संमोहित झाल्याप्रमाणे शांतपणे त्यांना ऐकत होते...

बालपणीची परिस्थिती, वारंवार होणाऱ्या बदल्या, नक्षलवाद्यांशी संवाद साधून शरण आणणं, आत्ताही मिळणाऱ्या पगारातच भागवायचं..सर्वच अलौकिक...अशा तप्ततेतून बाहेर येतं ते बावनकशी सोनंच..

दातेसरांसारखी कार्यतत्पर व स्वच्छ कारकीर्द असलेली पोलीसखात्यातील मंडळी खरंच विरळा..

या सर्व महत जबाबदारीच्या प्रवासात त्यांना सौ मनिषाताई उत्तम सहचर म्हणून मिळाल्या ...

त्यांनी सर्व प्रश्नांना तपशीलवार उत्तरं दिली.



- या नंतर उर्वरीत सेवावर्षात कुठे पोहोचलेलं पहायला आवडेल? मनाजोगतं पद मिळालं नाही तर नैराश्य येतं का?

दातेसरांचं उत्तर...ही सेवाच अशी आहे की जिथे जाऊ तिथे आपली छाप पाडायला वाव आहे. तुमच्या कनिष्ठ सहकाऱ्यांकडूनही भरपूर शिकता आलं..आयुष्य समाधानी आहे..

आधी मुंबई पोलीसदलाची स्कॉटलंड यार्डशी तुलना व्हायची...सद्य परिस्थिती काय आहे?

त्यांनी याला सविस्तर जगभरातल्या आकडेवारीनिशी उत्तर दिलं की लोकसंख्येच्या तुलनेत एकंदर घडणारे गुन्हे व व्याप्ती पाहता मुंबई पोलीसांची कामगिरी



निश्चितच उजवी आहे..

माजी पोलीस महासंचालक रिबेरोसरांनी त्यांचं यथोचित वर्णन केलंय ...की 'पोलीस खात्यातला हुशार कर्तव्यनिष्ठ व स्वच्छ प्रतिमा असणारा सदानंद दाते हे या नभांगणातला चमचमता तारा आहेत...त्यांच्या नावातच सारं काही इंगित आहे...सदा आनंदी राहणारे व कायम उत्तम सेवेचे दाते असणारे..

एका प्रज्ञावंताशी पार्लेकट्ट्याच्या प्रज्ञा काणेने अप्रतिम संवाद साधत सर्वांचीच मनं जिंकली..

आम्ही पार्लेकट्टा समिती भाग्यवंत की अशी गुणवंत अधिकारी व्यक्ती आम्हाला आज प्रमुख पाहुणे म्हणून लाभली..



**अमरेंद्र करंदीकर**
९८२०० ९६२९९